# देवाने दुष्ट नगराचा तट पाडला

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभू, मुलांचे तुझ्यावर प्रेम आहे. त्यांना तुझ्या आज्ञा पाळण्यास कृपा करुन साहाय्य कर'' मुलांच्या गरजा आणि वय यानुसार योग्य शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

मोठया मुलांनी किंवा शिक्षकांनी यरीहोच्या तटांविषयी वाचून दाखवावे किंवा सांगावे (यहोशवा 6:1-20)



- यहोशवा, ह्या सात्त्विक देवभिरु पुढ्याने देवाच्या आज्ञापालनाने आपल्या लोकांचे पुढारीपण केले.
- युद्धात विजय मिळवण्यासाठी देवाने त्याचे सामर्थ्य आणि इस्राएल लोकांचे आज्ञापालन ह्या दोहोंचा उपयोग कसा केला हे मुलांना शोधण्यास सांगा. त्यासाठी त्यांना आधी लक्षपूर्वक ऐकण्यास सांगा.

**कथावृत्तांत्त सांगून झाल्यावर** पुढील **प्रश्न** विचारा. प्रश्नांपुढे उत्तरे दिली आहेत.

- यरीहो जिंकून घेण्यासाठी देवाने कोणाला सूचना दिल्या? *(पाहा यहोशवा 6:2)*
- देवाने इस्राएल लोकांना सहा दिवस दररोज काय करण्याची आज्ञा दिली? *(पाहा वचन 3)*
- देवाने सातव्या दिवशी लोकांना काय करण्यास सांगितले? *(पाहा वचने 4-5)*
- लोकांनी देवाच्या आज्ञा पाळल्या तेव्हा यरीहोच्या तटांचे काय झाले? *(पाहा वचन 20)*
- यहोशवा उत्तम पुढारी आहे हे कशावरुन दिसले? *(त्याने देवाच्या सूचनांचे काळजीपूर्वक तेंतोतंत पालन केले).*

यरीहोच्या तटबंदीच्या कथा वृत्तांताचे नाट्यीकरण करा. ही नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढ्यायाशी बोलून व्यवस्था करा.

- मुलांकडून नाटिकेची तयारी करुन घ्या. मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.
- तुम्ही सर्व भागांचे नाट्यीकरण केलेच पाहिजे असे नाही.
- **मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात:

**निवेदक :** कथा वृत्तांत्ताचा सारांश करुन मुलांना त्यांचे संवाद पाठ करण्यास मदत करा.

**देवाची वाणी.**

**यहोशवा.** देवाच्या सूचनांचे पालन करा.

- **लहान मुलांनी** पुढील भूमिका कराव्यात.

**याजक.** कराराचा कोश दाखवण्यासाठी एक मोठा खोका घ्या. कागदाच्या गुंडाळया करुन रणशिंग म्हणून वाजवा.

**इस्राएल लोक.** तटाभोवती प्रदक्षिणा घाला.

**यरीहोचे लोक.** प्रथम इस्राएल लोकांना हसा. तट खाली कोसळल्यावर पळून जा.

**निवेदक :** यहोशवा 6:1-14 मधून कथा वृत्तांत्ताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''देव यहोशवाला काय सांगत आहे ते ऐका.''

**देवाची वाणी :** ''यहोशवा! सगळयांना यरीहोच्या भोवती फेरी घालण्यास सांगा. असे त्यांनी सात दिवस करावे. कराराचा कोश तुमच्या पुढे असावा. सातव्या दिवशी रणशिंगे फुंका म्हणजे तट कोसळून पडतील.''

**यहोशवा :** देवाच्या सूचनांचे पढ करा (देवाची वाणी).

**याजक :** कराराचा कोश वाहा आणि रणशिंगे फुंकित यरीहो शहराला प्रदशिणा घाला.

**इस्राएल लोक :** याजकांच्या मागे जात संपूर्ण तटाला प्रदक्षिण घाला.

**यरीहोचे लोक :** ''तुम्ही नुसतेच गोल गोल फिरत राहा,'' ''तुम्हांला कधीच आत येता येणार नाही.''

**निवेदक :** यहोशवा लोकांना काय सांगतो ते ऐका.'' यहोशवा 6:15-20 मधून वाचा,

**यहोशवा :** ''तुम्ही रणशिंगांचा आवाज ऐकाल तेव्हा मोठयाने जयघोष करा. तटाच्या भिंती जागच्याजागी कोसळतील. मग सरळ शहरात चालून जायचे.''

**याजक व इस्राएल लोक :** दगडांच्या राशीला सात वेळा प्रदक्षिणा घाला. प्रत्येक वेळी प्रदक्षिणा घालून झाल्यावर तिचा क्रमांक मोठयाने उच्चारा. सातव्या वेळी रणशिंगे फुंका, मोठयाने जयघोष करा आणि तटावर धडक द्या.

**यरीहोचे लोक :** पळून जा. मोठयाने म्हणा, ''इस्राएलाच्या देवाने आपल्या तटभिंती पाडून टाकल्या.''

**चित्र :** मुलांना यरीहोच्या पडलेल्या तटांचे चित्र काढायला सांगा किंवा दगड धोंडयांची रास काढा.

- मुलांनी हे चित्र उपासनेच्या वेळी मोठया माणसांना आणि घरी आपल्या आई-वडीलांना दाखवावे.
- सैतान आमच्याभोवती दुष्टाईच्या भिंती घालतो त्या पाडण्यासाठी देव त्याचे सामर्थ्य आणि आमचे आज्ञापालन अशा दोन्ही गोष्टींचा उपयोग कसा करतो हे ह्या चित्रावरुन पहायला मिळते हे मुलांनी स्पष्ट करुन सांगावे.
- मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.

**प्रश्न.** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर त्यांना वरील प्रश्न प्रौढांना विचारण्यास सांगावे.

**कार्यकृती.** सातव्या दिवशी यरीहोच्या पडलेल्या तटभिंती दाखवा.

- लहान लहान दगड-वीटांनी भिंत उभी करा.
- तटाभोवती प्रदक्षिणा कशी घालायची हे मोठया मुलाने दाखवावे.
- सात वेळा प्रदक्षिणा घालून झाल्यावर त्यांनी रणशिंग फुकल्याचा अभिनय करुन मोठयाने जयघोष करावा मग भिंतीला धक्का द्यावा.
- तुम्हांला दगडांच्या खाली चौकलेट्स किंवा काही वस्तू दडवून ठेवता येतील. मुलांना त्या शोधण्यास सांगा.

**चर्चा करा.** देव त्याच्या सामर्थ्याने महान गोष्टी करण्यासाठी आमच्या आज्ञापालनाचा कसा उपयोग करुन घेतो, याची इतर उदाहरणे सांगा (मुलांनी किंवा मोठया माणासांनी उदाहरणे द्यावीत)

**कविता :** नीती 3:5,6,11 व 12 ही वचने चार मुलांकडून प्रत्येकी एक असे म्हणून घ्या.

**पाठ करा** योहान 14:23

आठवडयातील विषयावर मोठया मुलांना कविता, गाणी किंवा नाटिका लिहिण्यास सांगा.

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू आम्ही तुझ्यावर प्रेम करतो. म्हणूनच आम्ही काय करावे अशी तुझी इच्छा आहे हे आम्हांला जाणून घ्यायचे आहे. तसेच अंत:करणपूर्वक तुझ्या आज्ञांचे विश्वासाने पालन करण्याची आमची इच्छा आहे. तुझे वचन समजावून सांगून आणि दररोज त्याचे अधिकाधिक पालन करण्यास मदत करणाूया आमच्या पुढाूयांवर आशीर्वाद पाठव.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net